# प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)
**(०२३५८) २८२३८७**

**अंक १०४/२०१८** **दिनांक २८/१२/२०१८** **कालावधी ५ दिवस**


| डॉ. सुभाष चव्हाण, | डॉ. विजय मोरे, | डॉ. शितल यादव, |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २२/१२/२०१८ ते २८/१२/२०१८) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २९/१२/२०१८ सकाळी ८:३० पासून ०२/०१/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२/१२ | २३/१२ | २४/१२ | २५/१२ | २६/१२ | २७/१२ | २८/१२ | | २९/१२ | ३०/१२ | ३१/१२ | ०१/०१ | ०२/०१ |
| ० | ० | ० | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३७.७ | ३४.२ | ३५.२ | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | २९ | ३० | ३० | ३० | २९ |
| १३.४ | १३.७ | १६.० | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | १८ | १८ | १९ | १८ | १८ |
| ० | ० | ० | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | १ | १ | १ | १ | ० |
| ८१ | ८७ | ८८ | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६७ | ६६ | ६६ | ६६ | ६७ |
| ३५ | ३२ | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ६२ | ६२ | ६१ | ६२ | ६२ |
| १.५ | १.७ | १.२ | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १० | १० | ९ | ८ | ८ |
| शांत | शांत | शांत | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | पू. | पू. | पू. | ई.पू. | ई.पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ३५५८.३ | ३४४२.२ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २९ डिसेंबर २०१८ ते १ जानेवारी २०१९ रोजी आकाश अंशता: मेघाच्छादित राहील. दिनांक २९ डिसेंबर २०१८ ते २ जानेवारी २०१९ पर्यंत वाऱ्याचा वेग ८ ते १० कि. मी. प्रति तास राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | रोप अवस्था | • पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रति गुंठा शेतास १ कि.ग्रॅ. युरिया खताचा दुसरा हफ्ता देण्यात यावा. |
| भुईमुग | शाखीय वाढीची अवस्था | • भुईमुग पिकास १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| आंबा | पालवी आणि बोंगे फुटण्याची अवस्था | • आंबा पिकामध्ये बोंगे फुटण्याच्या अवस्थेत तुडतुडयाच्या नियंत्रणासाठी प्रवाही लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के ६ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून झाडाच्या खोडावर, फांद्यावर व पानांवर बसेल अशारीतीने संपूर्ण झाडावर फवारणी करावी. तसेच भुरी रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी या फवारणीच्या द्रावणामध्ये ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात मिसळणारे ८० टक्के गंधक प्रति लिटर २० ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणात मिसळावे.<br>• नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये गवताचे आच्छादन करावे.<br>• नवीन लागवडीतील आंबा कलमाच्या जोडाखालील येणारी फुट वेळोवेळी काढून टाकावीत तसेच कलमाभोवती वाढलेली झुडपे व इतर काडी कचरा गोळा करून नष्ट करावीत. |
| काजू | मोहोर अवस्था | • काजूमध्ये मोहोर फुटण्याच्या अवस्थेत ढेकण्याचा (टी मॉस्कीटो बग) आणि फुलकिडीच्या नियंत्रणासाठी प्रवाही प्रोफेनोफोस ५० टक्के १० मि. ली. प्रति १० लि. पाण्यात मिसळून मोहोर फुटण्याच्यावेळी फवारणी करावी.(सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत)<br>• नवीन लागवड केलेल्या काजू कलमांना पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये गवताचे आच्छादन करावे.<br>• नवीन लागवडीतील काजू कलमाच्या जोडाखालील येणारी फुट वेळोवेळी काढून टाकावीत तसेच कलमाभोवती वाढलेली झुडपे व इतर काडी कचरा गोळा करून नष्ट करावीत. |
| सुपारी | - | • तीन वर्षावरील सुपारीच्या प्रति झाडास १६० ग्रॅम युरिया व १२५ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश असा खताचा दुसरा हप्ता देण्यात यावा. |
| कांदा | वाढीची अवस्था | • कांदा पिकामध्ये ८ ते १० दिवसांच्या अंतराने नियमित खुरपणी करावी तसेच गरजेनुसार पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | वाढीची अवस्था | • कलिंगड पिकामध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास कार्बेन्डाझीम १ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात द्रावण तयार करावे व वेलीच्या बुंध्याजवळ भिजवण करावी.<br>• टोमॅटो, वांगी, मिरची पिकावर पाने खाणारी अळी, तुडतुडे, मावा किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी मॅलेथीऑन २० मिली किंवा डायमेथोएट १५ मिली १० लिटर पाण्यात मिसळून १०-१५ पावसाच्या अंतराने फवारणी करावी.<br>• कोबीवर्गीय पिकामध्ये लागवडीनंतर २० ते २५ दिवसांनी खुरपणी करावी व रोपांना मातीची भर दयावी.<br>• भाजीपाला पिकास ६ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• फळबाग रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांना पिण्यासाठी कोमट व स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी.<br>• पशु वैदकांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष्यांना रानीखेत प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे.<br>• किमान तापमानात घट होत असल्याने रात्रीच्या वेळेस जनावरांच्या गोठयात तसेच कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे व दिवसा गोठयाची दारे व खिडक्या खुली ठेवावीत जेणे करून हवा खेळती राहील. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.**